Exh.15

# नेवासा येथील मे.ज्युडि.मॅजि.साहेब वर्ग १

यांचे कोर्टात

क्रि.चौ.अर्ज नं. 105 /२०२४

**अर्जदार**

१.मुस्कान भ्र.जोहेब शेख वय २५,धंदा काहीनाही

२.इफरा जोहेब शेख वय ६,धंदा शिक्षण

नं.२ ची अ.पा.क.जनक आई अर्जदार नं.१

दोघे रा.द्वारा उमराव बाबाखाँ पठाण रा.वाटापुर

ता.नेवासा जि.अहमदनगर

मो नं.९०५०७१९९०५

Order

---------------------

Read & recorded

SANDHYA YUVRAJ SUL

Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.09.30 17:55:39 +0530

2nd JMFC

**सामनेवाला**

जोहेब सलीम शेख

**याकामी अर्जदार नं.१ स्वत:साठी व अर्जदार नं.२ ची अपाक म्हणून सरतपासणीचे ॲफिडेव्हीट करते ते खालील प्रमाणे**

**याकामी मी मुस्कान भ्र.जोहेब शेख वय २५,धंदा काहीनाही रा.द्वारा उमराव बाबाखाँ पठाण रा.वाटापुर ता.नेवासा जि.अहमदनगर सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट करते की,**

Assistant Superintendent Criminal Court Newasa

१. माझा व सामनेवाला पती पत्नी आहे.तर अर्जदार नं.२ ही माझी व सामनेवाला यांची मुलगी आहे. मला सामनेवाला पासुन एकूण दोन अपत्य मुली झालेले आहे. त्यापैकी अर्जदार नं.२ ही माझ्याकडे राहत असून दुसरी मुलगी नामे मरीयम ही सामनेवाला कडे राहत आहे.

२. सदर माझा व सामनेवाला यांचा विवाह मुस्लीम धर्म शास्त्र पध्दतीने दि.२५/०९/२०१६ रोजी मौजे वाटापुर ता.नेवासा येथे थाटामाटात पार पाडलेला आहे. तेव्हा पासुन मी सामनेवाला याची धर्म पत्नी असून माझे लग्नानंतर सामनेवाला कडे मौजे वैजापुर ता.वैजापुर येथे नांदायला गेली. लग्नसंबंधातुन सामनेवाला पासुन मला मरीयम व इफरा असे दोन मुली असे अपत्ये झालेले आहे. अशी सत्य परिस्थीती असतांना सामनेवालाचे एकत्रीत कुटूंब असल्यामुळे सामनेवाला व त्याचे नातेवाईक मला मुली असल्यामुळे व मुलगा नसल्यामुळे घालुन पाडून बोलुन अपमान करीत असे. मी सामनेवालाचा व त्याचे आई वडिलांचा निमुट पणे त्रास सहन करुन संसाराकडे लक्ष देत असत. परंतु सामनेवला व सामनेवाला याचे आई वडिल, भाऊ,जाव हया सर्वांचा प्रमाणापेक्षा मला त्रास देणे सुरु राहिले. दरम्यानचे काळात सामनेवाला व त्याचे कुटूंबीयातील लोकांनी मला मारहाण करुन घर बांधण्यासाठी व फर्निचर घेण्यासाठी रक्कम रुपये ५ लाख रुपयाची मागणी केली व म्हणाले की, " जर तु तुझ्या वडिलांकडून पैसे आणले नाही तर तुला मी नांदविणार नाही " असे म्हणून सामनेवाला याने मला मारहाण करुन अंगावरील दागदागिणे हिसकावुन घेवुन एकावस्त्रानिशी मुलीसह घरातुन हाकलुन दिले. मी माहेरी आल्यांनतर सर्व प्रकार आई वडिलांना सांगितला असता माझ्या आई वडिलांनी मला व नातेवाईकांना व सोबत घेवुन सामनेवालाच्या घरी गेले. त्यावेळी सामनेवाला याचे घरी बैठक घेवुन सामनेवाला व त्याचे आई वडिल व भाऊ यांची समजुत घालुन मला नांदायला सोडून आले त्यानंतर साधारणत: ६ ते ७ महिने उलटून गेल्यांनतर सामनेवाला व त्याचे

घरातील लोकांनी पुन्हा रक्कम रुपये ५ लाखाची मागणी करुन मुलगा नसल्याचे कारणावरुन मला दि.१०/०८/२०२२ रोजी बेदम मारहाण करुन अंगावरील दागदागिणे हिसकावुन घेवुन मला मौजे वाटापुर येथे तिच्या माहेरी रात्री १२ ते १ चे दरम्यान आणुन सोडले. तेव्हा पासुन मी माझ्या तिच्या गरीब आई वडिलांकडे आश्रीत जिवण जगत आहे. सामनेवाला व त्याचे कुटूंबातील नातेवाईकांनी मला मुलीसह माहेरी आणून घातल्यानंतर १० ते १२ दिवसांनी सामनेवाला हा वाटापुर येथे येवुन मोठी मुलगी मरीयम हिस माझ्या कब्जातुन माहेरातुन घेवुन गेला. तेव्हा पासुन मोठी मुलगी ही सामनेवाला कडे राहत आहे.

३. सन २०२२ साली मला सामनेवाला व त्याचे नातेवाईकांनी रात्री माहेरी सोडल्यानंतर मी माझ्या आई वडिलांनी सामनेवाला सोबत वेळोवेळी बैठका घेवुन सामनेवाला व त्याची आई वडिल यांना समजावुन सांगुन मला नांदायला घेवुन जाण्याबाबत विनंती केली परंतु सामनेवाला व त्याचे कुटूंबातील सदस्यांनी काही ऐकले नाही व मला नांदायला नेले नाही. त्यानंतर काही महिने उलटून गेल्यानंतर श्रीरामपुरचे नातेवाईकांनी मध्यस्थी करुन मी व माझे आई वडिल व सामनेवाला व त्याचे आई वडिल व नातेवाईकांची श्रीरामपुर येथे दि.१/८/२०२४ रोजी बैठक झाली व त्या बैठकीत सामनेवाला याने अर्जदारास मानसीक त्रास दयावयाचा नाही तसेच बेकायदेशीर रक्कमेची मागणी करावयाची नाही असे ठरवुन मला नांदवयास घेवुन जायचे असे बैठकीत ठरले. परंतु ८ ते १५ दिवस उलटून ही सामनेवाला हा मला नांदायला घेवुन जाण्याची तयारी दर्शवित नसल्यामुळे माझ्याशी सामनेवालाशी संपर्क केला असता त्यावेळी सामनेवाला हा मला म्हणाला की," तुला नांदायला

यायचे असेल तर मी वैजापुर कोर्टात तुझ्या विरुध्द दावा दाखल केला आहे. त्या मध्ये तु हजर होवुन त्या मध्ये तडजोड करु व मग तु नांदायला माझ्याकडे ये " असे म्हणाला सामनेवाला याचे म्हणण्या नुसार मी वैजापुर न्यायालयात नेमलेल्या तारखेस सामनेवाला याने दाखल केलेल्या दाव्यात हजर झाले व त्यावेळी सामनेवाला याने दाखल केलेल्या दाव्याची प्रत घेतली सदरची प्रत घेवुन तिचे वाचन केले.सामनेवाल्याने मला वर केलेले खोटे आरोप हे मला सहन न झाल्यामुळे दवाखाण्यात ॲडमिट करावे लागले. सामनेवाला याने रे.मु.नं.३८२/२०२४ दाव्यात केलेले खोटे आरोपा बाबत माझ्या आई वडिलांनी सामनेवाला व त्याचे आई वडिलांची भेट घेवुन विचारणा केली असता सामनेवाल्याने उडवा उडविची उत्तरे देवुन टाळाटाळ केली व त्यावेळी सामनेवाला व त्याचे आई वडिल हे मी व माझ्या वडिलास म्हणाले की, " आम्ही घर बांधण्यासाठी मुलीला (मुस्कानला) तुझ्या माहेराहून ५ लाख रुपये घेवुन ये असे वारंवार मागुन ही तुमच्याकडून तुमची मुलगी मुस्कान पैसे आणत नाही. म्हणून मारहाण करुन रात्री आम्ही तिला तुमच्याकडे तिच्या माहेरी आणून घातले व ते पैसे मिळावे म्हणून रे.मु.नं.३८२/२०२४ मध्ये दावा दाखल करुन त्यामध्ये आरोप केलेले आहे. जर तुम्ही घर व फर्निचरसाठी ५ लाख देत असाल तर दावा आम्ही मागे घेवुन मुस्कानला मागे घेवुन जातो." असे सामनेवाला व त्याचे वडिल हे मला माझे वडिलास म्हणाले. त्यावेळी माझे वडिलांनी सामनेवाला यास म्हणाले की, " पैशासाठी माझ्यामुलीवर असे घाणरडे आरोप लावु नको, असे खोटे आरोप लावुन माझ्या मुलीची बदनामी करु नका पैशासाठी व मुलगा होत नाही

या कारणामुळे माझ्या मुलीचा संसार उधवस्त करु नका व माझी परिस्थीती गरीबीची आहे मी तुम्हाला पैसे देवु शकत नाही. भाऊ बहिणीच्या नात्याला कलंक लावु नका, माझ्या मुलीला नांदायला घेवुन जा तिला चांगले नांदवा " अशी विनवणी सामनेवाल्यास करुन ही सामनेवाल्याने व त्याचे नातेवाईकांनी ऐकले नाही त्यावेळी सामनेवाला म्हणाला की," मला ५ लाख रुपये दिलेतरच मी, अर्जदार मुस्कान हिस नांदविल अन्यथा नांदविणार नाही " असे म्हणून मी व माझे आई वडिल यांना व नातेवाईकांना दिनांक १६/१०/२०२४ रोजी झालेल्या बैठकित अपमानीत करुन हाकलुन दिले.

४. सामनेवाला व त्याचे आई वडिल यांनी मुद्दाम होवुन मला व माझे माहेराहून ५ लाख रुपयेसाठी व मुलगा होत नसल्याने या कारणावरुन मारहाण करुन आमचा त्याग केलेला आहे. आम्ही गेली २ वर्षा पासुन सामनेवाला व त्याचे कुटूंबातील नातेवाईकांनी रात्री माहेरी आणून घातल्या पासुन मी माझ्या गरीब आई वडिलांकडे आश्रीत जिवण जगत आहे

५. सामनेवाला हा आज न उदया सुधरेल व मला नांदायला घेवुन जाईल या अपेक्षेने मी सामनेवालावर आजपावेतो कोणतीही कायदेशीर कार्यवाही केलेली नाही. सामनेवाला याने मला माहेरी सोडल्यापासुन माझी कोणतीही देखभाल केलेली नाही व खर्चाची तजबीज केलेली नाही व मुलीच्या भविष्याचा व शिक्षणाचा परवा केली नाही. त्यामुळे माझ्यावर उपासमारेची वेळ आली. सामनेवाला हा एकत्रीत कुटूंबात राहत असल्यामुळे व स्वत: व्यवसाय करीत आहे. सामनेवाला याने आमच्याकडे मुद्दाम होवुन दुर्लक्ष केले आहे. सामनेवाला याची नैतिक

जबाबदारी असतांना ही सामनेवाला याने ती नाकारलेली आहे. माझी सामनेवाला कडे नांदायची प्रमाणिक इच्छा आहे परंतु सामनेवाला हो माझा त्याग करु पाहत आहे.

६. सामनेवाला यांना मौजे वैजापुर ता.वैजापुर येथे हायवेटच ३ एकर बागायती जमिन असून त्या जमिनी मधुन दरवर्षी नगदी पिके घेत असून खर्चावजा जाता त्यास वर्षा काठी निव्वळ नफा म्हणून ५ ते १० लाख रुपये राहतात. तसेच सामनेवाला हा स्वतः वैजापुर येथे पानपटरीचा व्यवसाय करीत असून त्या व्यवसायातुन त्यास दरमहा खर्च वजाजाता ३५ ते ४० हजार रुपये निव्वळ उत्पन्न मिळते. एकत्रीत कुटूंब असल्यामुळे भाऊ व वडिल हे मोठे व्यवसायीक असल्याने त्यांना वर्षाकाठी ५ ते १० लाख रुपये उत्पन्न मिळते. या उलट मी उपाशी पोटी व हलाकीत जिवन जगत आहे. सामनेवाला यांनी माझी खाण्या पिण्याची,औषध उपचाराची काहीएक व्यवस्था केलेली नाही. सदर सामनेवालेंची मला पोटगी देण्याची ऐपत आहे.

७. मी माझ्या आई वडिलांकडे सामनेवाला याने मुलगा होत नसल्या कारणाने दिलेल्या त्रासामुळे व पैश्याची बेकायदेशीर मागणी केल्यामुळे नाविलाजास्तव माहेरी राहत आहे व आई वडिलांकडे आश्रीत जिवण जगत आहे. सामनेवाल्याने माझी कुठलीही पालन,पोषनाची सोय केलेली नाही. मला बेदम मारहाण केल्यामुळे मला कुठलाही कामधंदा होत नाही. मी ही नेहमी आजारी असते. सामनेवाले हे मला प्रत्येकी दरमहा २० हजार रुपये पोटगी देवू शकतात व त्यांची त्या प्रमाणे ऐपत आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मला सामनेवाला अन्न,वस्त्र पोटगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

८. तसेच पुराव्याकामी मी जी कागदपत्र दाखल केली आहे त्यांना निशाणी नंबर देण्यात येवुन ती पुराव्याकामी वाचण्यात यावे. तसेच सामनेवाला विरुध्द मा.कोर्टाने नो से चा आदेश पारीत केलेला आहे.

९. **तरी माझी विनंती की,**

अ) आम्हाला सामनेवाला कडून अन्न,वस्त्र,पोटगी म्हणून दरमहा प्रत्येकी रक्कम रुपये २०,०००/- अर्जदाखल तारखे पासून देण्याचा हुकूम व्हावा.

ब) इतर योग्य ते न्यायाचा हुकूम माझे लाभात व्हावेत,

करीता हे ॲफिडेव्हीट करुन दिले असे

नेवासा

मुस्कान जोयब शेख

दिनांक ३०/०९/२०२५ ॲफि.करणार

ओळख

(ॲड.सी.टी.कदम)

याकामी मी मुस्कान भ्र.जोहेब शेख वय २५,धंदा काहीनाही रा.द्वारा उमराव बाबाखॉ पठाण रा.वाटापुर ता.नेवासा जि.अहमदनगर सत्य प्रतिज्ञेवर खरे सांगते की, वरील ॲफिडेव्हीट मधील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर असून त्याचे सत्यतेसाठी आजरोजी मी माझी सही केली आहे.

नेवासा

1 D 3040

मुस्कान जोयब शेख

दिनांक ३०/०९/२०२५ ॲफि.करणार

Solemnly affirmed before me
by Muskan Soheb Shaikh Age 25 occ Nil
who is identified before me
by Adv CT Kadam R/o Watapur
whom I personally know
30/9/2025 Newasa
Superintendent

पक्षकाराने दिलेल्या माहिती वरुन व दाखविलेल्या

कागदपत्रावरुन सदर अर्जाचा मसुदा तयार करुन

दाखल केला आहे.